# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा
## (स्थानिक गुन्हे शाखा, सातारा)

दुरध्वनी क्रमांक- ०२१६२-२३३९२३ फॅक्स क्रमांक - ०२१६२-२३०२३२
वेबसाईट - www.satarapolice.gov.in मेल आय डी - pilcb.satara@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट दिनांक १७ डिसेंबर २०२२

**(स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांची कारवाई)**

**(मंगळवार पेठ सातारा येथील जेष्ठ नागरिकाच्या चोरीचा गुन्हा उघड)**

---

दिनांक २७/११/२०२२ रोजी ००.४५ ते ०५.०० वा. दरम्यान तक्रारदार शिवदीन जनार्दन कुलकर्णी, वय ७७ वर्षे, रा. मंगळवार पेठ, सातारा यांच्या राहत्या घरात प्रवेश करुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने एक सोन्याचे मंगळसुत्र व एक मोबाईल हॅन्डसेट असा एकुण १ लाख २९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेल्याबाबत शाहुपूरी पोलीसा ठाणे गुरनं ३८२/२०२२ भादंवि कलम ३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा जेष्ठ नागरिकाच्या वयोवृध्दपनाचा फायदा घेवून ओळखीने केला असल्याचा तक्रारदार यांना संशय असल्याने त्यांनी गुन्हा उघड करणेकामी स्थानिक गुन्हे शाखेशी संपर्क साधला होता त्याबाबत श्री.समीर शेख पोलीस अधीक्षक सातारा व श्री.बापू बांगर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी पोलीस निरीक्षक अरुण देवकर स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना गुन्हा उघड करण्याचा सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांनी सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे यांच्या अधिपत्याखाली एक विशेष पथक तयार करुन त्यांना नमुद गुन्हा उघड करण्याचे आदेश दिले होते.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने फिर्यादी जेष्ठ नागरिक यांच्या ओळखीचे तसेच घरी येणा-या लोकांविषयी माहिती प्राप्त केली. त्याप्रमाणे तपास पथकास फिर्यादी यांच्या घरी नेहमी येणा-या एका इसमावर संशय निर्माण झाला. दरम्यान दिनांक १७/१२/२०२२ रोजी सदर इसम हा गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल करंजे नाका सातारा येथे विक्रीकरीता घेवुन येणार आहे अशी माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना मिळाली. त्याप्रमाणे त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास करंजे नाका सातारा येथे जावून कारवाई करण्याचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने करंजे नाका सातारा येथे जावून संशईत आरोपीस ताब्यात घेवून त्याची झडती घेतली असता त्याच्या ताब्यात चोरीस गेलेले १ लाख २५ हजार रुपये किंमतीचे अडीच तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र व मोबाईल हॅन्डसेट असा चोरीस गेलेला १ लाख २९ हजार रुपये किमतीचा पुर्ण मुद्देमाल मिळुन आला आहे. सदरचा मुद्देमाल जागीच जप्त करण्यात आला असून आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाईकरीता शाहुपूरी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे.

सदर कारवाईमध्ये श्री समीर शेख, पोलीस अधीक्षक सातारा, श्री बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सातारा, यांच्या मार्गदर्शनाखाली अरुण देवकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सातारा, सपोनि रमेश गर्जे, पोउनि अमित पाटील, पोलीस अंमलदार उत्तम दबडे, विजय कांबळे, अतिश घाडगे, संजय शिर्के, शरद बेबले, प्रविण फडतरे, गणेश कापरे, विशाल पवार, सचिन ससाणे, रोहित निकम, विक्रम पिसाळ, पृथ्वीराज जाधव, शिवाजी गुरव यांनी सहभाग घेतला असुन कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार यांचे श्री समीर शेख, पोलीस अधीक्षक सातारा, श्री बापू बांगर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केले आहे.



